# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

**नवीन प्रशासकीय इमारत खोली क्र. ३०७, तिसरा मजला, विधान भवना समोर, पुणे- ४११००१**

**दूरध्वनी क्र. ०२०- २६०५३०५६** **ई.मेल. msbccpune@gmail.com**


जा.क्र./प्र.क्र.२९/२०२४/प्रेस नोट/ १६४ दिनांक : १७ जानेवारी २०२४

प्रति,

मा.महासंचालक
माहिती व जनसंपर्क संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई ३२

विषय : प्रेस नोट देण्याबाबत

महोदय

उपरोक्त विषयान्वये मराठा समाजाचे सामाजिक,शैक्षणिक व आर्थिक सर्वेक्षणाचे कामकाज सुरू आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत सोबत जोडण्यात आलेल्या प्रेस नोटला राज्यातील सर्व वृत्तपत्रामध्ये, इलेक्ट्रॉनिक मिडीया व शासनाच्या सोशल मिडीया चॅनलवरून प्रसिद्धी देण्यात यावी, ही विनंती.

आपली

(आ.उ.पाटील)
सदस्य सदस्य
महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

## "प्रेसनोट"

***

महाराष्ट्र शासनाकडील दि. १३ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे काम महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपविले आहे. त्याअनुषंगाने राज्यातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण शासकीय यंत्रणेमार्फ़त करण्यात येणार आहे. सदर सर्वेक्षणासाठी सॉफ़्टवेअर तयार करण्यात आले आहे. सदर सर्वेक्षणासाठी शासकीय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.

दि. २० जानेवारी २०२४ रोजी जिल्ह्याच्या व महानगरपालिका मुख्यालयाच्या ठिकाणी तालुक्याच्या व वॉर्डस्तरीय प्रशिक्षकांना सॉफ़्टवेअर वापरण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येईल. हे वॉर्ड व तालुक्याचे प्रशिक्षक दि.२१ व २२ जानेवारी २०२४ रोजी संबंधीत तालुक्याच्या/ वॉर्डच्या ठिकाणी तालुक्यातील/ वॉर्डमधील सर्व नियुक्त कर्मचा-यांना प्रशिक्षण देतील व दि.२३ जानेवारी २०२४ पासून प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम सुरु होईल. हे सर्वेक्षण दि.३१ जानेवारी २०२४ पुर्वी पुर्ण करावयाचे आहे.

या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना आयोगामार्फ़त ओळखपत्र उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

(आ. उ.पाटील)
सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग